# खुल्या नियुक्त्यांना आणखी कात्री!

## सरकारी सेवेतील खुला प्रवर्ग आता आरक्षित वर्गांनाही मुक्त

मधु कांबळे, मुंबई

**विविध प्रवर्गांसाठी** लागू केलेले कप्पाबंद समांतर आरक्षण राज्य सरकारनेच रद्द केले असून आता ६८ टक्के आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना ३२ टक्के खुल्या जागांच्या प्रवर्गातही अर्ज करण्याची मुभा राहणार आहे. यामुळे खुल्या जागांना कात्री लागणार असली, तरी आरक्षित गटांत अधिक उमेदवारांना वाव मिळण्याची शक्यता आहे.



### नवा बदल...

- सरकारी नोकऱ्या तसेच शैक्षणिक क्षेत्रात एसईबीसी प्रवर्गासाठी १६ टक्के आरक्षण लागू केल्यानंतर सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदू नामावली निश्चित.
- त्यानुसार आता भरती करावयाच्या एकूण पदांच्या १६ टक्के आरक्षण.
- याआधी भरती करावयाच्या पदांपैकी अराखीव पदांच्या १६ टक्के आरक्षण लागू होणार होते. त्यात वरील प्रमाणे बदल.
- त्यामुळे मराठा समाजातील उमेदवारांना अधिकच्या जागा उपलब्ध होणार.
- परिणामी खुल्या जागा कमी होणार आहेत. बुधवारी त्यासंबंधीचाही आदेश जारी.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह सर्व प्रकारच्या सरकारी-निमसरकारी सेवेतील पदभरतीला हा निर्णय लागू केला जाणार आहे.

या निर्णयामुळे आता यापुढे सरकारी सेवेतील अराखीव (खुल्या) ३२ टक्के जागांवर मराठा समाजासह ६८ टक्के आरक्षित वर्गातील गुणवत्ताधारक उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरणार आहेत. त्याचबरोबर भरती करावयाच्या एकूण जागांवर सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गाकरिता (एसईबीसी) १६ टक्के आरक्षण लागू केले जाणार आहे. त्यामुळे मराठा समाजातील उमेदवारांसाठी अधिकच्या जागा प्राप्त होणार आहेत, तर अराखीव जागा त्या प्रमाणात कमी होणार आहेत. या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाने दोन स्वतंत्र आदेश बुधवारी जारी केले आहेत.

राज्य सरकारने १६ मार्च १९९९ च्या निर्णयानुसार महिला, अपंग आणि खेळाडू ***(पान १२ वर)***

लोकसत्ता Fri, 21 December 2018
epaper.loksatta.com/c/35053774

# खुल्या नियुक्त्यांना आणखी कात्री!

*(पान ३ वरून)* यांना अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग तसेच खुल्या म्हणजे अराखीव गटात समांतर आरक्षण लागू केले. त्यावेळी खुल्या गटातील समांतर आरक्षण हे सर्व मागासवर्गीयांसाठी खुले होते. मात्र राज्य सरकारने १३ ऑगस्ट २०१४ रोजी एक परिपत्रक काढून ते कप्पेबंद केले. म्हणजे मागासवर्गीयांतील गुणवत्ताधारक उमेदवारांनाही खुल्या जागांमधून स्पर्धा करण्याचे वा नियुक्त्या मिळविण्याचे दरवाजे बंद करण्यात आले. त्याचा फटका मागासवर्गातील अनेक गुणवत्ताधारक उमेदवारांना बसला. राज्य सरकारच्या या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिले गेले. मागासवर्गीयांना अराखीव जागांची दारे बंद करण्याचा निर्णय घटनाबाह्य आहे, असा अभिप्राय राज्याच्या महाधिवक्त्यांनी दिला होता. त्याचबरोबर महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई उच्च न्यायालय तसेच या न्यायालयाच्या नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठानेही समांतर आरक्षणाच्या पदांवर राखीव उमेदवारांचा समावेश करण्याबाबत आदेश दिले. त्यामुळे राज्य सरकारने ऑगस्ट २०१४ च्या परिपत्रकात दुरुस्ती करून पूर्वीचे समांतर आरक्षण रद्द केले. आता अराखीव जागांवरही गुणवत्तेच्या आधारावर एसईबीसीसह (मराठा) राखीव प्रवर्गातील उमेदवार दावा करू शकतात, तसेच ते नियुक्तीसाठी पात्र ठरतील.



देश
विद्वे
नजि

KONKAN HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD